Higher Secondary Education, Pune
S.R.No.832-A, Final Plot No. 178,179, Behind
Agharkar Research Institute, Bhamburda,
Shivajinagar, Pune-411004.

शिक्षण मंडळ पुणे
स.न.८३२-ए फा.प्लॉ.न.१७८,१७९ आघारकर
रिसर्च इन्स्टिट्यूटच्या मागे भांबुर्डा
शिवाजीनगर पुणे ४११००४

Tel : Chairman (P) : STD . (020)-25651751 Secretary(P) : 25651750 EPABX -25705000
Email : secretary.stateboard@gmail.com

तातडीचे/महत्वाचे

क्र.रा.म./लेखा/दुष्काळग्रस्त फी माफी/२६-२७/४०४४
दिनांक २९/०९/२०२६

प्रति,

विभागीय सचिव,
सर्व विभागीय मंडळे,

विषय: दुष्काळग्रस्त भागातील विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ करण्याबाबत.

संदर्भ:
१. या कार्यालयाचे क्र.रा.म./परीक्षा-३/३८५८, दिनांक १३/०८/२०२६ रोजीचे पत्र
२. या कार्यालयाचे क्र.रा.म./परीक्षा-३/३५०७, दिनांक १८/०८/२०२६ रोजीचे पत्र
३. मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, यांचा शासन निर्णय क्रमांक समिती-२०२६/प्र.क्र.८२/मदत-२, दिनांक २५ सप्टेंबर, २०२६
४. राज्य मंडळाचे क्र.रा.म./लेखा/दुष्काळग्रस्त फी माफी-प्रतिपुर्ती २६-२७/४०३०, दिनांक २८/०९/२०२६ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्र क्र. १ व २ अन्वये फेब्रुवारी-मार्च २०२७ मधील महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र इ.१० व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र इ.१२ वी परीक्षेस प्रविष्ट होवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षांची आवेदनपत्रे ऑनलाईन पध्दतीने भरून घेण्याबाबत सविस्तर सुचना निर्गमित केलेल्या आहेत.

तथापी, शासन निर्णय दिनांक २५ सप्टेंबर, २०२६ अन्वये महाराष्ट्र राज्यातील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाल्यामुळे राज्य शासनाने २६५ तालुक्यांमध्ये विशेष बाब म्हणून उपाययोजना व सवलती लागू करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्यामध्ये शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात माफी देण्याबाबत नमूद केलेले आहे.

त्यास अनुसरून शासन निर्णयानुसार फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये आयोजित इ.१०वी व इ.१२ वी परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांकडून पुढील आदेश येईपर्यंत परीक्षा शुल्क न घेता आवेदनपत्रे भरून घेण्याची कार्यवाही करण्यात यावी. याबाबत राज्य मंडळामार्फत पुढील सविस्तर सुचना यथाशिघ्र निर्गमित करण्यात येतील. तरी आपणामार्फत विभागातील दुष्काळग्रस्त तालुक्यातील सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना तसा तात्काळ सूचना देण्यात याव्यात. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य मंडळास तातडीने सादर करावा.

(मा.अध्यक्ष, यांचे मान्यतेने)

Mali
(डॉ.दिपक माळी)
सचिव,
राज्य मंडळ, पुणे

प्रत माहितीस्तवः-
१.मा.प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
२.मा.आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३.खाजगी सचिव, मा.मंत्री, शालेय शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई

---

पुविमं/लेखा-३/दुष्काळग्रस्त फी माफी / 10206
पुणे-४११००५
दिनांक : ०५/१०/२०२६

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा/कनिष्ठ महाविद्यालये
पुणे, अहिल्यानगर, सोलापूर

---

विषय : महाराष्ट्र राज्यातील दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झालेल्या २६५ तालुक्यांमधील शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कात माफी देण्याबाबत ...

संदर्भ : १. मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय, शासन निर्णय क्रमांकः- समिती-२०२६/प्र. क्र.८२/मदत-२ दिनांक २५/०९/२०२६
२. क्र.रा.मं./लेखा/ दुष्काळग्रस्त फी माफी/२६-२७/४०४४ दिनांक २९/०९/२०२६

Scanned with OKEN Scanner

उपरोक्त संदर्भिय क्रमांक २ च्या पत्रान्वये राज्य मंडळाने संदर्भिय क्रमांक १ च्या शासन निर्णयाद्वारे शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र राज्यातील दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झालेल्या २६५ तालुक्यांमधील शालेय/ क. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्कात माफी देण्याबाबत कळवले आहे.

पुणे, अहिल्यानगर व सोलापूर जिल्ह्यातील दुष्काळी घोषित करण्यात आलेल्या तालुक्यांची जिल्हानिहाय यादी खालीलप्रमाणे:

| अ. क्र. | जिल्हा | तालुके | तालुक्यांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | पुणे | भोर, वेल्हा, खेड, शिरूर, बारामती, इंदापूर, दौंड, पुरंदर | ८ |
| २ | अहिल्यानगर | नगर, पारनेर, श्रीगोंदा, कर्जत, जामखेड, शेवगाव, पाथर्डी, नेवासा, राहुरी, संगमनेर, अकोले, कोपरगाव, श्रीरामपूर, रहता | १४ |
| ३ | सोलापूर | उ. सोलापूर, द. सोलापूर, बार्शी, अक्कलकोट, मोहोळ, माढा, करमाळा, पंढरपूर, सांगोला, माळशिरस, मंगळवेढा | ११ |
| | | एकूण तालुके | ३३ |

त्यानुसार, सर्व शाळांनी व कनिष्ठ महाविद्यालयांनी उपरोक्त तालुक्यातील फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये आयोजित इ. १० वी व इ. १२ वी परीक्षेस प्रविष्ठ सर्व विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे परीक्षा शुल्क न घेता भरून घेण्याची कार्यवाही करावयाची आहे.

Digitally signed by
MINAKSHI BHARAT RAUT
Date: 13-10-2026
14:01:20

(मिनाक्षी राऊत)
विभागीय सचिव
पुणे विभागीय मंडळ, पुणे

Scanned with OKEN Scanne